ePaper

अगरवालच्या चालकाचं घूमजाव, जबाब बदलला; पोर्शे अपघात प्रकरणात नवा ट्विस्ट



॥ वर्ष - 7 । अंक - 333 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- राजस्थानचा आरसीबीवर विजय
- विराट कोहलीने रचला इतिहास
- तुम नज़रें ठीक करो!
- ‘RSS शी नातं न सांगणं म्हणजे ढोंग’


www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 24 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## लोकसभा निकालानंतर मिशन-विधानसभा

# मुदतपूर्व विधानसभा निवडणूक?

### » महायुतीला यशाची खात्री: मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री स्तरावर खलबते!

।पुणे ।महाईन्यूज

**नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीचे निकाल 4 जून रोजी जाहीर होणार आहेत. या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला चांगले यश मिळणार, अशी खात्री राज्याचा विद्यमान महायुती सरकारला असल्याने निकालानंतर याच यशाचा फायदा घेण्यासाठी आठवडाभरात विधानसभा बरखास्त करुन राज्यात मुदतपूर्व विधानसभा निवडणुका घोषित केल्या जाऊ शकतात, असे खात्रीलायक वृत्त सूत्रांकडून मिळाले आहे.**





राज्यातील लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचे पाच टप्पे पूर्ण झाले असून ४ जूनला लोकसभा निवडणुकांचे निकाल जाहीर होणार आहेत. राज्याचे विद्यमान महायुती सरकार व विरोधी महाविकास आघाडीत सरळ सरळ लोकसभा निवडनुकांच्या लढती झाल्या आहेत.

या दोन्ही गटांचे, तसेच महाराष्ट्रातील मतदारांचे कोण हारणार कोण जिंकणार याकडे लक्ष लागले असून ४ जूनच्या निकालात महायुतीला ३५ ते ३८ जागा मिळतील, असा प्रशासनाचा गोपनीय अहवाल महायुती सरकारला मिळाला असल्याने सध्याच्या राज्यातील विविध मुद्यातून ढवळलेल्या वातावरणाच्या स्थितीत पार पडलेल्या निवडणुकीत मिळणारे ‘हे यशही नसे थोडके’ असे महायुतीला वाटते. त्यामुळे विद्यमान विधानसभा लोकसभा निवडणूक निकालानंतर बरखास्त करुन राज्यात मुदतपूर्व विधानसभा निवडणूक घोषित केली जाऊ शकते, असे सूत्रांकडून समजते.

दरम्यान, याच पार्श्वभूमीवर महायुतीतील भाजपा, शिवसेना (शिंदे गट) तर राष्ट्रवादी (अजित पवार गट) तिन्ही पक्ष मिशन विधानसभा म्हणून पक्ष्याच्या बैठकांचे आयोजन केले जाऊ शकते. त्या अनुषंगाने यापैकी अजित पवार गटाची २७ तारखेला महत्वाची मिशन विधानसभा बैठक मुंबई येथे होणार आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेसची महत्वाची बैठक

राष्ट्रवादी काँग्रेसची महत्वाची बैठक सोमवारी (ता. २७ मे) रोजी सकाळी ११ ते २ यावेळेत गरवारे क्लब हाऊस, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली व राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ही महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. या बैठकीला मंत्री, आजी-माजी खासदार-आमदार, पदाधिकारी, कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस व कोषाध्यक्ष शिवाजीराव गर्जे यांनी निमंत्रित केले असल्याची माहिती औरंगाबाद विभागाचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी दिली.

## कल्याणीनगर अपघातानंतर प्रशासनाला जाग

### » 32 पब, बार, रुफटॉपवर कारवाईचा बडगा

।पुणे। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

अल्पवयीन मुलांना मद्य विक्री करणे, रात्री दीडनंतरही बार सुरू ठेवणे, बेकायदा मद्यसाठा करणे अशा विविध कारणांसाठी शहरातील ३२ पब, रुफटॉप हॉटेल्स आणि बारवर उत्पादन शुल्क विभागाने कारवाईचा बडगा उगारून ते सील केले आहेत. यामध्ये चौदा पबचा समावेश असून कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर खडबडून जागे झालेल्या उत्पादन शुल्क यंत्रणेने जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ही कारवाई केली आहे.






कल्याणीनगर येथे अल्पवयीन मुलाने आलिशान कार भरधाव वेगाने चालवून दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीस्वार तरुण-तरुणीचा मृत्यू झाला. तत्पूर्वी, या अल्पवयीन मुलाने त्याच्या मित्रांसोबत मुंढव्यातील दोन पबमध्ये पार्टी केली होती. या मुलाच्या वयाची खातरजमा न करता त्याला मद्य पुरविल्याप्रकरणी पोलिसांनी संबंधित पबचा मालक, व्यवस्थापक, बार काउंटर व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यावर गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली आहे. न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडीत ठेवले आहे. या अपघातानंतर शहरातील पब, बारमध्ये सुरू असलेले गैरप्रकार उघड झाल्याने सरकारी यंत्रणांवर चहूबाजूने टीकेची झोड उठली.

औद्योगिक क्षेत्र आणि निवासी क्षेत्र यांच्यातील बफर झोन गायब

### वर्षभरात 297 परवानाधारकांवर गुन्हे

राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाने २०२३-२४ या वर्षभरात एकूण २९७ परवानाधारक पब, बार, हॉटेल्स-रेस्तराँवर विविध कारणांसाठी गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. त्यामध्ये एक कोटी १२ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून १७ परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तर दोन परवाने कायमस्वरुपी रद्द करण्यात आले आहेत, अशी माहिती उत्पादन शुल्क विभागाने दिली.